नांदेड जिल्ह्यातील माध्यमिक स्तरावरील विविध माध्यमाच्या शाळेतील विद्यार्थ्यांमधील नेतृत्वगुण, व्यवस्थापन कौशल्य व उद्योजकता यांचा तुलनात्मक अभ्यास

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडच्या आंतर विद्याशाखीय अभ्यास
विद्याशाखेतर्गत शिक्षणशास्त्र विद्यावाचस्पती पदवीच्या अंशत:
पूर्ततेसाठी सादर केलेला संशोधन आराखडा

संशोधक

संदीप निवृतीराव पानपट्टे

मार्गदर्शक

डॉ. सोमनाथ किशनराव पचलिंग

शिक्षणशास्त्र संकुल

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

डिसेंबर -२०२४

नांदेड जिल्ह्यातील माध्यमिक स्तरावरील विविध माध्यमाच्या शाळांतील विद्यार्थ्यांमधील नेतृत्वगुण, व्यवस्थापन कौशल्य व उद्योजकता यांचा तुलनात्मक अभ्यास

प्रस्तावना :

शाळा हे एक शैक्षणिक केंद्र आहे. जिथे इयत्ता पहिली ते दहावी पर्यंतचा अभ्यासक्रम शिकवला जातो. असे म्हणतात की शाळा हे विद्यार्थ्यांचे दुसरे घर आहे. ज्ञानाचे आदान - प्रदान हे शाळेच्या माध्यमातून होत असते. शाळेपासून आपले प्राथमिक शिक्षण चालू होते. आणि शाळा ही आपल्या मूळ शिक्षणाचा पाया ठरतो. आयुष्याची जडणघडण येथेच होते. तसेच आपल्या व्यक्तिमत्त्व विकासाची ती पहिली पायरी असते असेच म्हणावे लागेल.

शाळा ही सर्वांगीण विकासाचा पाया भक्कम करणारे एक माध्यम आहे, तसेच नवनवीन गोष्टी येथे शिकवल्या जातात. तिथे मुलांना नवे काहीतरी शिकण्याची संधी मिळते. स्वतःला सिद्ध करण्याची संधी मिळते. शाळेमुळे सर्वांगीण विकास म्हणजेच बौद्धिक विकास, सामाजिक विकास, मानसिक विकास, शारीरिक विकास व नैतिक विकास होत असतो.

विविध माध्यम शाळा (Multilingual Schools) म्हणजे:

"विविध माध्यम शाळा" म्हणजे शिक्षण देण्यासाठी वेगवेगळया भाषांचा वापर करणारी शाळा. मराठी, हिंदी, इंग्रजी किंवा इतर भाषा (उर्दू) माध्यमांमध्ये शिक्षण देणाऱ्या शाळांना विविध माध्यम शाळा म्हणतात.

- **विविध भाषांचा वापर:**

या शाळांमध्ये विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीच्या किंवा सोयीच्या भाषेत शिक्षण घेण्याची संधी मिळते.

- **भाषांचा विकास:**

विविध भाषांच्या माध्यमातून शिक्षण दिल्याने विद्यार्थ्यांची भाषिक क्षमता वाढते.

- **सांस्कृतिक आदानप्रदान:**

विविध भाषा आणि संस्कृतींशी संपर्क येतो, ज्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये सांस्कृतिक समजूतदारपणा वाढतो.

- **शिक्षणाची उपलब्धता:**

विविध भाषिक विद्यार्थ्यांना त्यांच्या मातृभाषेत शिक्षण घेण्याची सोय होते, ज्यामुळे शिक्षणाची उपलब्धता वाढते.

- **सर्वसमावेशक शिक्षण:**

विविध भाषिक विद्यार्थ्यांना शाळेत सामावून घेणे सोपे होते, कारण त्यांना त्यांच्या भाषेत शिक्षण घेता येते.

उदाहरणे:

- काही शाळांमध्ये मराठी, हिंदी आणि इंग्रजी या तीनही भाषांमध्ये शिक्षण दिले जाते.
- काही शाळांमध्ये स्थानिक भाषेसोबतच इंग्रजी माध्यमाचाही पर्याय असतो.
- काही शाळांमध्ये वेगवेगळया विषयांसाठी वेगवेगळी माध्यमं वापरली जातात, जसे विज्ञान इंग्रजीमध्ये आणि सामाजिक शास्त्रे मराठीमध्ये.

थोडक्यात विविध माध्यम शाळा विद्यार्थ्यांना अधिक प्रभावी आणि मातृभाषेतून शिक्षण देण्यास मदत करतात. या शाळा विद्यार्थ्यांच्या सर्वगुणसंपन्न विकासाला चालना देतात. विद्यार्थ्यामध्ये विविध गुण असतात या गुणांच्या जोरावर त्यांची भविष्यातील विकासाची दिशा ठरत असते. जसे कि नेतृत्वगुण

असणारे विद्यार्थी राजकारण, समाजकारण, शिक्षण क्षेत्रात कार्य करण्यास समर्थ बनतात. रज व्यवस्थापन कौशल्य असणारे विद्यार्थी उद्योग किंवा इतर व्यवसायात व्यवस्थापनाचे कार्य प्रभावीपणे करु शकतात. उद्योजकता गुण असणारे विद्यार्थी कोणत्याही व्यावसायिक उद्योगात यशस्वी होतील. वरिल तिन्ही गुणांचा विकास विविध माध्यमाच्या शाळेत होताना दिसून येतो. आज नांदेड जिल्ह्यामध्ये मराठी, इंग्रजी, हिंदी आणि उर्दू माध्यमाच्या माध्यमिक शाळा कार्यरत आहेत या विविध माध्यमाच्या शाळेत विद्यार्थ्यांचा वरील गुणांच्या संदर्भात विकास कसा होतो याचा तुलनात्मक अभ्यास करण्याची गरज संशोधकाला वाटली म्हणून संशोधकाने **नांदेड जिल्ह्यातील माध्यमिक स्तरावरील विविध माध्यमाच्या शाळांतील विद्यार्थ्यांमधील नेतृत्वगुण, व्यवस्थापन कौशल्य व उद्योजकता यांचा तुलनात्मक अभ्यास**. प्रस्तुत संशोधन समस्या संशोधनासाठी निवडलेली आहे.

संशोधनाची गरज:

१. नेतृत्वगुण शल्य व उद्योजकताव्यवस्थापन कौ हि गुण विद्यार्थ्यांमध्ये विकसित होणे हि सध्याच्या युगाची आवश्यकता बनली आहे.

२. आधुनिक काळात विद्यार्थ्यांना सध्य परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी विद्यार्थ्यांमधील नेतृत्वगुण,व्यवस्थापन कौशल्य व उद्योजकता ह्या गुणाच्या विकासाला अधिक महत्व दिले जाणार आहे.

३. माध्यमिक स्तर हा विद्यार्थ्यांच्या विविध गुणांच्या विकासासाठी अनुकूल काळ असलेला कालखंड असल्याने या काळात विद्यार्थ्यांमधील नेतृत्वगुण, व्यवस्थापन कौशल्य व उद्योजकता गुण विकसित होणे गरजेचे वाटते.

४. प्रस्तुत संशोधनातून नांदेड जिल्ह्यातील माध्यमिक स्तरावरील विविध माध्यमाच्या शाळांतील विद्यार्थ्यांमधील नेतृत्वगुण,व्यवस्थापन कौशल्य व उद्योजकता यांचा तुलनात्मक अभ्यास केला जाणार आहे.

संशोधनाचे महत्त्व :

कोणतेही संशोधन संशोधनासाठी विषयाचे महत्त्व लक्षात घ्यावे लागते. त्यानुसारच संशोधक संशोधन करीत असतो. म्हणून संशोधनाचे महत्त्व पुढील प्रमाणे सांगता येईल.

१) प्रस्तुत संशोधनातून माध्यमिक स्तरावरील विविध माध्यमाच्या शाळेतील विद्यार्थ्यामधील नेतृत्वगुणांचा शोध घेता येईल.

२) प्रस्तुत संशोधनातून माध्यमिक स्तरावरील विविध माध्यमाच्या शाळेतील विद्यार्थ्यामधील व्यवस्थापन कौशल्याचा शोध घेता येईल.

३) प्रस्तुत संशोधनातून माध्यमिक स्तरावरील विविध माध्यमाच्या शाळेतील विद्यार्थ्यामधील उद्योजकतेचा शोध घेता येईल.

४) प्रस्तुत संशोधनातून नांदेड जिल्ह्यातील माध्यमिक स्तरावरील विविध माध्यमाच्या शाळांतील विद्यार्थ्यामधील नेतृत्वगुण, व्यवस्थापन कौशल्य व उद्योजकता यांचा तुलनात्मक अभ्यास करण्यास मदत होईल.

समस्या विधान:

नांदेड जिल्ह्यातील माध्यमिक स्तरावरील विविध माध्यमाच्या शाळांतील विद्यार्थ्यामधील नेतृत्वगुण, व्यवस्थापन कौशल्य व उद्योजकता यांचा तुलनात्मक अभ्यास

कार्यात्मक व्याख्या :

संशोधन प्रक्रियेमध्ये संशोधकाला संशोधन कार्यामध्ये कोणत्याही प्रकारची अडचण येऊ नये, म्हणून अगोदरच सर्व शब्दाच्या व्याख्या कार्यात्मक स्वरूपामध्ये मांडाव्या लागतात त्यामुळे संशोधन प्रक्रियेमधील अडथळे दूर करता येतात.

१) नांदेड :

माध्यमिक स्तरावरील विविध माध्यमाच्या शाळा असलेले मराठवाड्यातील नांदेड एक जिल्ह्याचे ठिकाण आहे.

२) माध्यमिक स्तर:

नांदेड जिल्ह्यातील ९ वी व १० वीचे शिक्षण देणाऱ्या विविध माध्यमाच्या शाळेचा स्तर म्हणजे माध्यमिक होय.

३) विविध माध्यम शाळा :

नांदेड जिल्ह्यातील म्हणजे माध्यमिक स्तरावरील एकापेक्षा अधिक भाषा माध्यमाचा वापर करून शिक्षण देणारी शाळा असा याचा अर्थ आहे. शिक्षण देण्यासाठी वेगवेगळया भाषांचा वापर करणारी शाळा. उदा. मराठी, हिंदी, इंग्रजी किंवा इतर भाषा (उर्दू)माध्यमांमध्ये शिक्षण देणाऱ्या शाळांना विविध माध्यम शाळा म्हणतात.

४) विद्यार्थी :

नांदेड जिल्ह्यातील माध्यमिक स्तरावरील विविध माध्यमाच्या शाळेत शिक्षण घेणारे इयत्ता ९ वी व १० वीचे विद्यार्थी.

५) नेतृत्व गुण :

नांदेड जिल्ह्यातील माध्यमिक स्तरावरील विविध माध्यमाच्या शाळेतील विद्यार्थ्याकडे असलेले नेतृत्व गुण ज्यामध्ये त्या विद्यार्थ्यात असलेले गुण, जे तिला इतरांना मार्गदर्शन करण्यासाठी, प्रेरणा देण्यासाठी आणि त्यांच्याकडून काम करून घेण्यासाठी उपयुक्त ठरतात. या गुणांमध्ये संवाद, सहानुभूती, आत्मविश्वास, दृढता, निर्णय क्षमता, सकारात्मकता, आणि जबाबदारी यांसारख्या गोष्टींचा समावेश होतो.

६) व्यवस्थापन कौशल्य:

नांदेड जिल्ह्यातील माध्यमिक स्तरावरील विविध माध्यमाच्या शाळेतील विद्यार्थ्यांकडे असलेले व्यवस्थापन कौशल्य ज्यामध्ये शालेय कामाच्या वेळेचे नियोजन, प्रकल्प आयोजन, गट नेतृत्व, शालेय संवाद साधणे आणि वयक्तिक समस्या सोडवणे, विद्यार्थ्यांना त्यांचे शिक्षण आणि इतर कामे व्यवस्थितपणे आयोजित करणे, जसे की नोट्स घेणे, अभ्यास साहित्य व्यवस्थित ठेवणे, इत्यादी. यांसारख्या कौशल्यांचा समावेश होतो. विद्यार्थ्यांना त्यांच्या अभ्यासात आणि इतर कामांमध्ये नियमितता ठेवणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांना इतरांशी चांगले संबंध ठेवणे आणि त्यांच्यासोबत काम करणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांना त्यांच्या भावनांवर नियंत्रण ठेवणे आणि सकारात्मक दृष्टिकोन ठेवणे महत्त्वाचे आहे. विद्यार्थ्यांना त्यांचे शैक्षणिक आणि वैयक्तिक ध्येये निश्चित करणे आणि ती पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे.

७) उद्योजकता :

विविध माध्यमाच्या शाळेतील विद्यार्थ्यांकडे असलेले नेतृत्वगुण ज्यामध्ये नवीन कल्पना, जोखीम, संधी, व्यवस्थापन करण्यासाठी आवश्यक असलेल्या योजना, लवचिकता, आत्मविश्वास, नेटवर्किंग आणि प्रक्रिया तयार करणारी क्षमता म्हणजे उद्योजकता होय. हे काही महत्वाचे गुण आहेत, जे विद्यार्थी उद्योजकांसाठी आवश्यक आहेत. या गुणांच्या आधारावर, विद्यार्थी स्वतःचा व्यवसाय यशस्वीपणे सुरू करू शकतात आणि वाढवू शकतात.

८) **तुलनात्मक अभ्यास:**

विविध माध्यमाच्या शाळेतील (मराठी, इंग्रजी, हिंदी व उर्दू) विद्यार्थ्यांचा नेतृत्वगुण, व्यवस्थापन कौशल्य व उद्योजकता यासंदर्भातील तुलनात्मक अभ्यास होय.

संशोधनाची उदिष्टे:

संशोधन कार्याची प्रभावी यशस्वीता ही अचूक व प्रभावी संशोधनाच्या उद्दिष्टांवर अवलंबून असते. प्रस्तुत संशोधन कार्यासाठी संशोधकाने खालील उद्दिष्टे नियोजित केली आहेत.

१) नांदेड जिल्ह्यातील माध्यमिक स्तरावरील मराठी, इंग्रजी, हिंदी व उर्दू माध्यमाच्या शाळेतील विद्यार्थ्यांमधील नेतृत्वगुणाचा शोध घेणे.

२) नांदेड जिल्ह्यातील माध्यमिक स्तरावरील मराठी, इंग्रजी, हिंदी व उर्दू माध्यमाच्या शाळेतील विद्यार्थ्यांमधील व्यवस्थापन कौशल्याचा शोध घेणे.

३) नांदेड जिल्ह्यातील माध्यमिक स्तरावरील मराठी, इंग्रजी, हिंदी व उर्दू माध्यमाच्या शाळेतील विद्यार्थ्यांमधील उद्योजकता कौशल्याचा शोध घेणे.

४) नांदेड जिल्ह्यातील माध्यमिक स्तरावरील मराठी, इंग्रजी, हिंदी व उर्दू माध्यमाच्या शाळेतील विद्यार्थ्यांमधील नेतृत्वगुण, व्यवस्थापन कौशल्य व उद्योजकता यांचा तुलनात्मक अभ्यास करणे.

५) **संशोधनाची गृहीतके:**

१) शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण, व्यवस्थापन कौशल्य व उद्योजकता ही गुण त्यांना चांगला व्यवस्थापक, उद्योजक निर्माण करण्यात चांगली भूमिका बजावतात.. – (द्विवेदी, रुची).

२) माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांची नेतृत्वगुण, व्यवस्थापन कौशल्य व उद्योजकता ही गुण विकसित करण्यात शाळेतील शिक्षण प्रक्रियेचा मोठा वाटा असतो. (द्विवेदी, रुची).

३) विविध माध्यमाच्या शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण, व्यवस्थापन कौशल्य व उद्योजकता ही गुण विकसित होतात. (द्विवेदी, रुची).

संशोधनाची परिकल्पना:

सदर संशोधन कार्यासाठी संशोधकाने संशोधन परिकल्पनेचा वापर करण्याचे निश्चित केले आहे.

संशोधन परिकल्पना:

१) नांदेड जिल्ह्यातील माध्यमिक स्तरावरील मराठी, इंग्रजी, हिंदी व उर्दू माध्यमाच्या शाळेतील विद्यार्थ्यांमधील नेतृत्वगुण, व्यवस्थापन कौशल्य व उद्योजकता हे गुण अधिक चांगल्या प्रकारे विकसित करण्याची गरज आहे.

२) नांदेड जिल्ह्यातील माध्यमिक स्तरावरील मराठी, इंग्रजी, हिंदी व उर्दू माध्यमाच्या शाळेतील विद्यार्थ्यांमधील नेतृत्वगुण, व्यवस्थापन कौशल्य व उद्योजकता हे गुण विकसित करण्यासाठी शाळेकडून विविध कृतीयुक्त प्रयत्न करण्याची गरज आहे.

३) नांदेड जिल्ह्यातील माध्यमिक स्तरावरील मराठी, इंग्रजी, हिंदी व उर्दू माध्यमाच्या शाळेतील विद्यार्थ्यांमधील नेतृत्वगुण, व्यवस्थापन कौशल्य व उद्योजकता हे गुण विकसित करण्यासाठी शाळेतील माध्यमांची भूमिका महत्वाची ठरते.

४) नांदेड जिल्ह्यातील माध्यमिक स्तरावरील मराठी, इंग्रजी, हिंदी व उर्दू माध्यमाच्या शाळेतील विद्यार्थ्यांमधील नेतृत्वगुण, व्यवस्थापन कौशल्य व उद्योजकता हे गुण सारख्या प्रमाणात विकसित झालेले नाहीत.

शून्य परिकल्पना:

१) नांदेड जिल्ह्यातील माध्यमिक स्तरावरील मराठी व इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील विद्यार्थ्यामध्ये नेतृत्वगुण या गुणांच्या विकासात सार्थ फरक नाही.

२) नांदेड जिल्ह्यातील माध्यमिक स्तरावरील मराठी व इंग्रजी माध्यमाच्या विद्यार्थ्यामध्ये व्यवस्थापन कौशल्य या गुणांच्या विकासात सार्थ फरक नाही.

३) नांदेड जिल्ह्यातील माध्यमिक स्तरावरील मराठी व इंग्रजी माध्यमाच्या विद्यार्थ्यामध्ये उद्योजकता या गुणांच्या विकासात सार्थ फरक नाही.

४) नांदेड जिल्ह्यातील माध्यमिक स्तरावरील मराठी व हिंदी माध्यमाच्या विद्यार्थ्यामध्ये नेतृत्वगुण या गुणांच्या विकासात सार्थ फरक नाही.

५) नांदेड जिल्ह्यातील माध्यमिक स्तरावरील मराठी व हिंदी माध्यमाच्या विद्यार्थ्यामध्ये व्यवस्थापन कौशल्य या गुणांच्या विकासात सार्थ फरक नाही.

६) नांदेड जिल्ह्यातील माध्यमिक स्तरावरील मराठी व हिंदी माध्यमाच्या विद्यार्थ्यामध्ये उद्योजकता या गुणांच्या विकासात सार्थ फरक नाही.

७) नांदेड जिल्ह्यातील माध्यमिक स्तरावरील इंग्रजी व हिंदी माध्यमाच्या विद्यार्थ्यामध्ये नेतृत्वगुण या गुणांच्या विकासात सार्थ फरक नाही.

८) नांदेड जिल्ह्यातील माध्यमिक स्तरावरील इंग्रजी व हिंदी माध्यमाच्या विद्यार्थ्यामध्ये व्यवस्थापन कौशल्य या गुणांच्या विकासात सार्थ फरक नाही.

९) नांदेड जिल्ह्यातील माध्यमिक स्तरावरील इंग्रजी व हिंदी माध्यमाच्या विद्यार्थ्यामध्ये उद्योजकता या गुणांच्या विकासात सार्थ फरक नाही.

१०) नांदेड जिल्ह्यातील माध्यमिक स्तरावरील मराठी व उर्दू माध्यमाच्या विद्यार्थ्यामध्ये नेतृत्वगुण या गुणांच्या विकासात सार्थ फरक नाही.

११) नांदेड जिल्ह्यातील माध्यमिक स्तरावरील मराठी व उर्दू माध्यमाच्या विद्यार्थ्यामध्ये व्यवस्थापन कौशल्य या गुणांच्या विकासात सार्थ फरक नाही.

१२) नांदेड जिल्ह्यातील माध्यमिक स्तरावरील मराठी व उर्दू माध्यमाच्या विद्यार्थ्यामध्ये उद्योजकता या गुणांच्या विकासात सार्थ फरक नाही.

१३) नांदेड जिल्ह्यातील माध्यमिक स्तरावरील हिंदी व उर्दू माध्यमाच्या विद्यार्थ्यामध्ये नेतृत्वगुण या गुणांच्या विकासात सार्थ फरक नाही.

१४) नांदेड जिल्ह्यातील माध्यमिक स्तरावरील हिंदी व उर्दू माध्यमाच्या विद्यार्थ्यामध्ये व्यवस्थापन कौशल्य या गुणांच्या विकासात सार्थ फरक नाही.

१५) नांदेड जिल्ह्यातील माध्यमिक स्तरावरील हिंदी व उर्दू माध्यमाच्या विद्यार्थ्यामध्ये उद्योजकता या गुणांच्या विकासात सार्थ फरक नाही.

१६) नांदेड जिल्ह्यातील माध्यमिक स्तरावरील इंग्रजी व उर्दू माध्यमाच्या विद्यार्थ्यामध्ये नेतृत्वगुण या गुणांच्या विकासात सार्थ फरक नाही.

१७) नांदेड जिल्ह्यातील माध्यमिक स्तरावरील इंग्रजी व उर्दू माध्यमाच्या विद्यार्थ्यामध्ये व्यवस्थापन कौशल्य या गुणांच्या विकासात सार्थ फरक नाही.

१८) नांदेड जिल्ह्यातील माध्यमिक स्तरावरील इंग्रजी व उर्दू माध्यमाच्या विद्यार्थ्यामध्ये उद्योजकता या गुणांच्या विकासात सार्थ फरक नाही.

संशोधनाची व्याप्ती:

१. आशय व्याप्ती:

प्रस्तुत संशोधनाची व्याप्ती ही नांदेड जिल्ह्यातील माध्यमिक स्तरावरील मराठी, इंग्रजी, हिंदी व उर्दू माध्यमाच्या शाळेतील विद्यार्थ्यांमधील नेतृत्वगुण, व्यवस्थापन कौशल्य व उद्योजकता यापुरती व्यापक आहे.

२. क्षेत्र व्याप्ती:

प्रस्तुत संशोधन हे नांदेड जिल्ह्यातील माध्यमिक स्तरावरील मराठी, इंग्रजी, हिंदी व उर्दू माध्यमाच्या शाळा यापुरते व्यापक आहे.

३. काल व्याप्ती:

प्रस्तुत संशोधन हे डिसेंबर – २०२५ ते डिसेंबर – २०२८ या कालावधीत पूर्ण करण्यात येईल.

संशोधनाची मर्यादा:

१. आशय मर्यादा:

प्रस्तुत संशोधनाची व्याप्ती ही नांदेड जिल्ह्यातील माध्यमिक स्तरावरील मराठी, इंग्रजी, हिंदी व उर्दू माध्यमाच्या शाळेतील विद्यार्थ्यांमधील नेतृत्वगुण , व्यवस्थापन कौशल्य व उद्योजकता यापुरते मर्यादित आहे.

२. क्षेत्र मर्यादा:

प्रस्तुत संशोधन हे नांदेड जिल्ह्यातील माध्यमिक स्तरावरील मराठी, इंग्रजी, हिंदी व उर्दू माध्यमाच्या शाळा यापुरते मर्यादित आहे.

३. काल मर्यादा:

प्रस्तुत संशोधन हे डिसेंबर – २०२५ ते डिसेंबर – २०२८ या कालावधीत पूर्ण करण्यात येईल.

परिमर्यादा:

१. प्रस्तुत संशोधनात केवळ नांदेड जिल्ह्यातील माध्यमिक स्तरावरील मराठी, इंग्रजी, हिंदी व उर्दू माध्यमाच्या शाळा यांचाच अभ्यास करण्यात येणार आहे.

२. प्रस्तुत संशोधनात केवळ नांदेड जिल्ह्यातील माध्यमिक स्तरावरील इयत्ता ९ वी व १० वीच्या विद्यार्थ्यांचा अभ्यास केला जाणार आहे.

शैक्षणिक संशोधनाची पद्धती:

प्रस्तुत संशोधन कार्यासाठी संशोधकाने प्रस्तुत समस्या हि वर्तमानकालीन असल्याने सर्वेक्षण संशोधन पद्धतीचा वापर करण्याचे नियोजित केले आहे. कारण प्रस्तुत संशोधन विषयाच्यादृष्टीने सर्वेक्षण संशोधन पद्धती अभ्यासासाठी संशोधकाला समर्पक वाटते.

संशोधनाची जनसंख्या:

नांदेड जिल्ह्यातील मराठी, इंग्रजी, हिंदी व उर्दू माध्यम शाळेतील इयत्ता ९ वी व १० वीचे सर्व विद्यार्थी हि संशोधनाची जनसंख्या आहे.

संशोधनाचा नमुना/न्यादर्श:

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने सुगम यादृच्छिक पद्धतीच्या सहेतुक निवड पद्धतीने नमुना निवड करण्याचे निश्चित केले आहे. संशोधक नांदेड या जिल्ह्यातील माध्यमिक शाळेतील ४०० विद्यार्थी (मराठी माध्यम – १००, इंग्रजी माध्यम – १००, हिंदी माध्यम- १०० आणि उर्दू माध्यम – १००) न्यादर्श म्हणून निवडणार आहे.

माध्यम	वर्ग ९ वी	वर्ग १० वी	एकूण
मराठी	५०	५०	१००

इंग्रजी	५०	५०	१००
हिंदी	५०	५०	१००
उर्दू	५०	५०	१००
एकूण	२००	२००	४००

संशोधनाची माहिती संकलनाची साधने:

संशोधन कार्याचे निष्कर्ष अचूक येण्यासाठी संशोधनाचे विश्लेषण करणारी माहिती संकलनाची साधने ही अचूक वस्तूनिष्ठ असली पाहिजेत तेव्हाच संशोधनाचे विश्लेषण करणे व अचूक निष्कर्ष काढणे शक्य होते प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने खालील साधनांचा समावेश केला आहे.

1) पडताळा सूची

या साधनांचा वापर माहिती संकलनासाठी करणार आहे.

संशोधनाची सांख्यकीय साधने:

सदर संशोधन कार्यासाठी संशोधकाने योग्य त्या सांख्यकीय साधनांचा वापर करण्याचे निश्चित केले आहे. १) मध्यमान २) सरासरी विचलन ३) टी – टेस्ट

संशोधनाची कार्यवाही:

१) संशोधन समस्या निश्चिती.

२) संशोधनकार्यासाठी न्यादर्श निश्चिती.

३) संदर्भ साधनांची निवड.

४) समस्या निगडित माहिती संकलन.

५) प्रश्नावली निर्मिती.

६) प्रतिसादकाना प्रश्नावली देणे.

७) माहिती विश्लेषण.

८) निष्कर्ष व शिफाराशी.

संशोधनाचे वेळापत्रक:

१) संशोधन समस्या निवड	डिसेंबर -२०२४
२) संशोधन आराखडा तयार करणे	
३) संबंधित साहित्यचा आढावा	जून-२०२५
४) संशोधन साधन निर्मिती	डिसेंबर -२०२६
५) माहिती संकलन करणे	जून -२०२६
६) माहिती संकलन व विश्लेषण	डिसेंबर -२०२७
७) निष्कर्ष व शिफारसी	जून -२०२८
८) अहवाल लेखन करणे	डिसेंबर-२०२८
९) सादरीकरण	डिसेंबर-२०२८

संशोधनाचे अंदाजपत्रक:

१) संशोधन समस्या निश्चिती व प्राथमिक माहिती	१०००० रू
२) क्षेत्र भेटी	४५००० रू
३) माहिती संकलन- संगणक खरेदी	८५०००रू
४) संबधित साहित्याचा आढावा- साहित्य स्टेशनरी	२५००० रू
५) माहिती विश्लेषण- ग्रंथ खरेदी	२५००० रू
६) निष्कर्ष मांडणी	२५००० रू
७) अहवाल लेखन- टंकलेखन	४५००० रू
एकूण	२६०००० रू

संदर्भ ग्रंथ सूची :

- अहेर, हि.रा., .(१९९५) *उदयन्मुख भारतीय समाजातील शिक्षण व शिक्षक*. विद्या प्रकाशन, :नागपूर.
- डॉ .आगलावे, प्रदीप, (२००७). *भारतीय समाज व्यवस्था व मुल्ये*. विद्या प्रकाशन, : नागपूर.
- डॉ .आगलावे, प्रदीप, (२००७). *सामाजिक संशोन्धन पद्धती*. विद्या प्रकाशन, : नागपूर.
- डॉ .जगताप, ह.ना., (१९९२) *शिक्षणातील नव विचारप्रवाह व नवप्रवर्तने*. नुतन प्रकाशन, :पुणे .
- डॉ.दुनाखे, अरविंद, (१९८३)*उदयोन्मुख भारतीय समाजातील शिक्षण*. डायमंड पब्लिकेशन ,:पुणे.
- डॉ .नागतोडे, किरण, .(२००७) *भारतीय शिक्षण पध्द्तीचा विकास*. विद्या प्रकाशन, :नागपूर.
- पाटील, लि .ला., .(१९७४) *आजचे शिक्षण आजच्या समस्या*. श्री विद्या प्रकाशन, :पुणे.
- बापट, भा.गो. (१९९५) *शैक्षणीक संशोधन*. नूतन प्रकाशन, :पुणे.
- भिंताडे, वि.रा.(१९८९) *शैक्षणीक संशोधन पद्धती*. नूतन प्रकाशन, :पुणे.
- द्विवेदी, रुची. (२०२२) *माध्यमिक स्तरावर नेतृत्व कौशल्ये विकसित करण्यासाठी विद्यार्थी नेतृत्व कार्यक्रम एसएलपीचा विकास आणि अंमलबजावणी*. पीएच.डी., शिक्षणशास्त्र विभाग, महाराजा सयाजीराव विद्यापीठ, :बडोदा.
- Dr.kothari, C.R. (2001). .*Research Methodology*. Wishawa Prakashan, :New Delhi.

संशोधकाचे नाव | मार्गदर्शक

संदीप निवृतीराव पानपट्टे

डॉ. सोमनाथ किशनराव पचलिंग
स.से.सं. अध्यापक महाविद्यालय,
विष्णुपुरी, ता.जि. नांदेड